# BDC LIBRARY

## New Paper Clipping

## A.Y. 2023-202

# आंतरविद्याशाखीय चर्चासत्र ही आजची गरज : डॉ. शिर्के

**पाटण : पुढारी वृत्तसेवा**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षणात खूप बदल करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमापासून ते त्यांच्या परीक्षा पद्धतीमध्ये सुद्धा नवीन बदल करण्यात आलेले आहेत आणि हे बदल समजून घेण्यासाठी आंतरविद्याशाखीय चर्चासत्र ही आजच्या काळाची गरज बनली आहे, असे मत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे कुलगुरू प्रो. डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले,.

कोयना एज्युकेशन सोसायटी संचालित बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण याठिकाणी आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्रांत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी श्रीमंत अमरसिंह पाटणकर होते. कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक श्रीमंत याज्ञसेन पाटणकर व संजीव चव्हाण, प्राचार्य डॉ. एस.डी. पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. चर्चासत्रासाठी बीजभाषक म्हणून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे मराठी विभाग प्रमुख प्रो. डॉ. नंदकुमार मोरे व पुणे येथील प्रो.डॉ. प्रवीण सप्तर्षी उपस्थित होते. भाषा विभागांच्या वतीने 'भाषा एवं संस्कृति: मराठी, हिंदी आणि इंग्रजी साहित्यातील बदलते स्वरूप' या विषयावर तर सामाजिकशास्त्र विभागाचे 'शाश्वत विकासासाठी साधन संपत्तीचे नियोजन व व्यवस्थापन' या विषयावर चर्चासत्र आयोजित केले होते.



पाटण : चर्चासत्रामध्ये बोलताना प्रो. डॉ. डी. टी. शिर्के. व्यासपीठावर अमरसिंह पाटणकर, याज्ञसेन पाटणकर व इतर मान्यवर.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले की, प्रदीर्घ कालावधीनंतर भारताच्या शैक्षणिक धोरणामध्ये एवढा मोठा अमूलाग्र बदल होताना दिसतो आहे.

चर्चासत्रात विषयतज्ज्ञ म्हणून प्रो. डॉ. प्रभंजन माने, प्रो. डॉ. मिथिलेश अवस्थी, प्रो. डॉ. भरत जाधव, प्रो. डॉ. सुनील सावंत, प्रो. डॉ. रघुनाथ ढमकले, प्रो.डॉ. सुनील बनसोडे, सामाजिकशास्त्र विभागाकडून प्रो. डॉ. विजय कुंभार, प्रो. डॉ. एस.के. पवार प्रो. डॉ. अवनीश पाटील इत्यादी विचारवंतांची मार्गदर्शक व्याख्याने होऊन त्यावर चर्चा करण्यात आल्या.

आभार आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. एच. व्ही काटे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. सुयश कुंभार व प्रा. सौ. सी. एन. माने देशमुख यांनी केले. चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी मराठी विभागातील प्रो. डॉ. पी. जे. ऐवळे, प्रा. डॉ. विनायक राऊत, प्रा. श्रीगणेश गायकवाड हिंदी विभागातील प्रो. डॉ. व्ही. बी. कुरणे, प्रा. डॉ. सौ. हेमलता काटे तर इंग्रजी विभागातील प्रा. डॉ. एस. एस. पवार, प्रा. एस. ए. किरपेकर तसेच सामाजिकशास्त्र विभागामध्ये भूगोलशास्त्र विभागातील डॉ. एस. एस. तडाखे, लेफ्ट. डॉ. एस. पी. पाटील अर्थशास्त्र विभागातील प्रा. डॉ. पी. वाय. फडणीस, प्रा. डॉ. जी. एस. पट्टेबहादूर, प्रा. तुषार महाले इतिहास विभागातील डॉ. आर. जी. कांबळे, प्रा. लक्ष्मण गणगे, राज्यशास्त्र विभागातील प्रा. आयेशा आत्तार, प्रा. आर. आर. शेख यांनी परिश्रम घेतले.